महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४००००१, दू.०२२-२२६२०२३१/३२,
Website-www.doa.maharashtra.gov.in Email ID: directorateofart@gmail.com

---

# प्रसिध्दीपत्रक

दिनांक : २०/०६/२०२४

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठीचे सुधारित वेळापत्रक

--------

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता १ वर्ष, २ वर्षे व ४ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य् अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी सूचना दिनांक १ जून २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिनांक २० जून २०२४ अशी आहे. तथापि काही विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वाढविणेबाबत विचारणा होत आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता १ वर्ष, २ वर्षे व ४ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष पदविका/प्रमाणपत्र कला विषयक अभ्यासक्रम प्रवेशासाठी यापूर्वी ऑनलाईन अर्ज न केलेल्या उमेदवारांनी खालील वेळापत्रकानुसार http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेश (Admission) या विंडोवर "पदविका अभ्यासक्रम प्रवेश २०२४-२५" यावर अथवा https://doaonline.co.in/FA2024 लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

**प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि सुधारित नियोजित तारखा :-**

| अ.क्र. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | पहिली दिनांक | सुधारित अंतिम दिनांक |
| १ | १)मुलभूत अभ्यासक्रम, २)कला शिक्षक पदविका ३)आर्ट मास्टर(सुट्टीतील/अंशकालीन), ४)रेखा व रंगकला, ५)उपयोजित कला, ६)शिल्पकला व प्रतिमानबंध, ७)अंतर्गत गृहसजावट, ८)वस्त्रकाम (टेक्सटाईल), ९)मातकाम (सिरॅमिक व पॉटरी), १०)कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवाराद्वारे संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे, महाविद्यालय व अभ्यासक्रम निवडणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायांप्रती अपलोड करणे | ०१/०६/२०२४ | ३०/०६/२०२४ |
| २ | उमेदवारांसाठी पहिली तात्पुरती निवड यादी प्रदर्शित करणे, | ०३/०७/२०२४ | |
| ३ | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी तात्पुरत्या निवड यादीबाबत काही तक्रार असल्यास त्या inform.doa@gmail.com या ईमेल वर सादर करणे | ०४/०७/२०२४ | |
| ३ | उमेदवारांसाठी पहिली निवड यादी प्रसिध्द करणे | ०८/०७/२०२४ | |
| ४ | संबंधीत महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दिनांक | ०९/०७/२०२४ | १२/०७/२०२४ |

(टिप:-वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल.)

सही/-)
(आरती श्रावस्ती)
प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सही/-
(राजीव मिश्रा)
कला संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई